



दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

। बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ●अंक १५३ ● बुधवार, दि. ११ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955





# मुस्लिमांच्या मरणावर तरी तरस खा

## तलवाड्याच्या कब्रस्थानासाठी जीवंत माणसांचा ठिय्या





- अतिक्रमण हटवा दोन दिवसात संरक्षण भिंत देऊ
- मुस्लिमांच्या सब्रचा ईमतिहान घेऊ नका: लोकपत्रकार
- जिल्ह्यातले सर्व कब्रस्थान अतिक्रमण मुक्त करा: शफिक भाऊ
- मुस्लिमांवर सरकार अन्याय करतय : पूजा मोरे
- आम्ही मुस्लिमांच्या सोबत : बाळासाहेब म्हस्के
- प्रशासनाने अंत पाहू नये : बदामराव पंडित

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा गावात मुस्लिमांच्या दफनभूमीत अतिक्रमण झाले असून यावर गेली चार वर्षे चालणारा संघर्ष काल शिगेला पोहोचला . तहसील समोर हजारो मुस्लिम महिला पुरुष निर्वाणीचा लढा देण्यासाठी एकवटले . बीड नगर परिषदेच्या समोर प्रचंड समुदायाने प्रशासनाचा घाम काढला . तहसील प्रशासन सुस्त असून अतिक्रमण आजच काढणार असाल तर आम्ही उठू असा निर्वाणीचा पावित्रा घेतल्यावर उपजिल्हाअधिकारी व तहसीलदार यांनी तात्काळ ठिय्या स्थळ गाठून तात्काळ नोटीसा रवाना केल्या .

### ▸ सात दिवसांत अतिक्रमण उठणार

तीन दिवसात धारकानी अतिक्रमण काढावे नाहीतर प्रशासन सात दिवसात अतिक्रमण काढील व खर्च वसूल करील असे नोटीसा तलाठी सज्जावरुन तात्काळ देण्यात आल्या .

### ▸ भागवत तावरे उभे राहताच टाळ्या

मुस्लिमांच्या हक्क प्रश्नावर लोकपत्रकार जिल्ह्यात आणि जिल्ह्याच्या बाहेर जातात आणि परखड बोलतात . उर्दू हिन्दी मध्ये तासभर केलेल्या भाषणात भागवत तावरे यांनी भाजप सत्तेला अगदी फाडून काढले , सत्तेने मुस्लिमांचा छळ थांबवावा . नाहीतर ज्याच्या सहनशक्तीचे दाखले दिले जातात त्या मुस्लिमांना लढण्याचा देखील इतिहास आहे . भागवत तावरे यांनी राजकीय लोकांनी देखील सामान्य लोकांचे प्रश्न सोडवावे असे म्हटले .

### ▸ विजयराजे पूर्ण वेळ थांबून

विजयराजे पंडित यांनी सदरील प्रश्नी उपोषण सोडेपर्यन्त आंदोलकात हजर होते . त्यांनी सदरील प्रश्न सोडवून घेण्यासाठी प्रयत्न केले . आपण या संदर्भने संरक्षक भिंत देऊ आणि अतिक्रमण मुक्त दफनभूमी करू असे म्हटले .

### ▸ मौलाना जाकेर कडून पालकमंत्र्यांना फोन

मौलाना जाकेर यांनी गेवराईच्या आंदोलनात येऊन थेट पालकमंत्री धनंजय मुंडे यांना फोन लावला , मला चार दिवस द्या म्हणताच शफिक भाऊ कडून आजच तोडगा काढा म्हटले . तेव्हा लोकांनी जोरदार घोषणा केला तेव्हा पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या आणि प्रशासन गतिमान झाले .

### ▸ मुस्लिम कब्रस्तान अतिक्रमण संदर्भात लोकप्रतिनीचा जाहीर पाठिंबा दिला होता

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित,विजय राजे पंडित, एम आय एम के बीड जिल्हा अध्यक्ष अँड शफिक भाऊ,जमीयते उलमा हिंद के मराठवाडा अध्यक्ष जाकीर सिद्दिकी,पवार गटाचे प्रदेश अध्यक्ष पूजाताई मोरे, मयुरी ताई बाळासाहेब खेडकर, मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे,महेश आण्णा दाभाडे, कृषी बाजार समिती सभापती मुजीब पठाण, माजी जि प,सदस्य अँड सुरेश हत्ते, लहुजी बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष दादाराव रोकडे, सरपंचपती विष्णू हात्ते, समता परिषद तालुका अध्यक्ष बापू गाडेकर,संत रविदास प्रतिष्ठानचे संस्थापक तुळशीराम वाघमारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार गटाचे शहराध्यक्ष सय्यद अख्तर, सय्यद आफसर,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे, घटनेचे तालुकाध्यक्ष आनंद सुतार, वडार संघटनेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र विटकर साहेबा कुराडे, अभिजित थोरात,माजी सैनिक संघटना, शेतकरी संघटना.

▸ माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय राजे पंडित यांनी अतिक्रमण काढल्यानंतर मुस्लिम कब्रस्तान वॉल कंपाऊंड मी बांधून देणार आहे, जाहीर केले

# अंधारे मॅडम धरणं भरले, किमान चार दिवसाला पाणी सोडा : नवनाथ शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरला पाणीपुरवठा करणारे बिंदुसरा धरण ओव्हरफ्लो झाले. तर माजलगाव बॅक वॉटर मध्ये पन्नास टक्के पेक्षा अधिक जलसाठा उपलब्ध आहे. गणपती, महालक्ष्मी सन चालू आहे. दसरा, दिवाळी तोंडावर असताना बीड करांना अजूनही पंधरा दिवसाला पिण्याचे पाणी मिळते. धरण उशाला आणि जलसाठा असूनही बीडकरांच्या घशाला कोरड कायम आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी प्रशासक व नगरपालिकेचे सीओ अंधारे मॅडम यांनी वेठीस धरू नये. तातडीने किमान चार दिवसाला पिण्याचे पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा. असे आवाहान भाजपाचे माजी नगरपरिषद सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.



बीड शहरातील नागरिक रहिवासी नगरपालिकेचा कर, पाणी पट्टी, घर पट्टी इमाने इतबारे वर्षाची वर्षाला नगरपालिकेला भरणा करतात. लाखो रुपयाचा कर व्याजासह बीड शहरातील नागरिक नगरपरिषद कडे भरणा करतात. या पैशाचा सदुपयोग करून जनतेला पाणी दिले पाहिजे. एकीकडे रोख कर घेतात परंतु त्या मोबदल्यात जबाबदारी असूनही पाणी मिळत नाही. अनेक कारणे सांगून नागरिकांचे तोंड बंद करतात. ही कारणे ऐकून नागरिकांचे कान बधीर झाले आहेत. त्यांच्या सहनशिलतेचा अंत न पाहता जनतेच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी. असे आवाहन भाजपा नेते तथा माजी न.प. सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.





*दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयामध्ये श्रींची पूजा करून आरती करताना बीड वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे साहेब , बीड चे नगरसेवक शुभम भैय्या धुत, गणपत आप्पा डोईफोडे माजी उप सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बीड तथा जिल्हा परिषद सदस्य, सरपंच ईट., पोलीस श्री विठ्ठल काळे साहेब, अभिजित आव्हाड, सागर वाव्हुळ, यश पेंढारे, संपादक दत्तात्रय नरनाळे आदी मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत.*

# आ.क्षीरसागरांची जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक

## कपिलधारवाडीत उपाययोजना, शेतकर्यांना सरसकट भरपाईची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कपीलधारवाडी येथे भुस्खलनाचा मोठा धोका आहे. याठिकाणी कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी सर्वेक्षण करून तातडीने उपाययोजना करण्यासंदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी मा. जिल्हाधिकार्यांसोबत बैठक घेतली. बीड तालुक्यात कपीलधारवाडी गावामध्ये भुस्खलनाचा धोका असल्याचे गेल्या अनेक दिवसांपासून जाणवत आहे. येथील नागरिकांचे सुरक्षेच्या दृष्टीने पुनवर्सन होणे अत्यंत आवश्यक आहे. दरम्यान कपीलधारवाडी गावच्या पुनवर्सनाचा प्रस्ताव गेल्या अनेक

➧ (उर्वरित पान २ वर)

### ▸ जाचक अटी बाजूला ठेवून, सरसकट भरपाईची मागणी

**काही दिवसांपूर्वी बीड जिल्हाम ध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. बीड तालुक्यातील जवळपास २३३ गावे अतिवृष्टीमुळे बाधित झाले असून ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे देखील स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. शासनाने जाचक अटी बाजूला ठेवून शेतकरी बांधवांना सरसकट मदत द्यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.**

# बीडच्या फडात 'गावरान' डाव

## श्रीमंत प्रस्थापित विरुद्ध गरीब विस्थापित




बीड म्हणजे धक्के देणारा मतदारसंघ गेल्या ३० वर्षात चार वेळा विस्थापिताना संधी दिली , नवले तूपे धांडे आणि आत्ताचे धाकले क्षीरसागर हे चेंज आणि बदल म्हणून बीड ने निवडून दिले . बीडच्या मतदार संघाचा मतदार बदलावर विश्वास ठेवणारा मात्र त्या तुलनेत निवडी सिद्ध झाल्या नाहीत हे वेगळे . या वेळी देखील विस्थापितांची हाक बेंबीच्या देठापासून समोर येते आहे . शहराच्या तुलनेत गावाकडची चेहरे थेट मैदानात आहेत . ईछुक असलेल्या यादीत गावाकडची बनावट थेट स्पर्धेत आहे आणि पुढे देखील . प्रस्थापित लोकांची यादी पाहता अस्वस्थता आहे . शेख तय्यब नागापूर राजेंद्र मस्के पालवण कुंडलीक खांडे म्हाजवळा भागवत तावरे नाळवंडी रमेश पोकळे चांदेगाव अनिल जगताप केतुरा सीए जाधव शाहजानपुर बळी गवते बेलूरा गंगाधर काळकुटे ससेवाडी दिलीप गोरे पारगाव ही यादी पाहता गावाकडचे चेहरे मुंबईच्या दिशेने निघाले आहेत.

जातीच्या पलीकडे जाऊन विस्थापितांचा चेहरा निवडून द्यायचा अशी मानसिकता मतदार संघाची आहे , होऊ द्या गरिबाचे लेकरू अशी स्थिति असून कुठलाही येऊ द्या पण येऊ द्या सामान्य असा होरा लोकांतून समोर येताना दिसत आहे . प्रस्थापित लोकानी या दोन महिन्यात आरोग्य शिबिरे नौकरी देणारे सोहळे आयोजित केलेत त्यात सेवाभाव कमी आणि व्यापार अधिक आहे , आताचे भांडवल उद्याचा नफा आहे . यातला अर्थ आणि दडलेला स्वार्थ मतदार जाणून आहेत आता लोक मुद्दा दिशा आणि ज्याच्याकडे धोरण त्याला तोरण लावतील अशी स्थिति आहे . गरिबांच्या लेकराना २४ मध्ये वाव असल्याचे स्पष्ट दिसत आहे . यावेळी बीड शहरात गुलाल उधळणार कुठला तरी गावकरी अशी स्थिति आहे त्यामुळे बीडच्या फडात गावरान डाव प्रस्थापितांना भारी पडेल अशी स्थिति आहे.

# नव्या बसस्थानकच्या परिसरात चक्क दारु विक्री,

## दारुचा ग्लास खेळ खल्लास, अनेकांची घरे उध्वस्त



**गेवराई । प्रतिनिधी**

दारू च्या नशेत भावी पिढी उद्धवस्त होत आहे. असे असतानाही निव्वळ महसूल मिळतो म्हणून प्रशासना कडून स्वत:च्या नियमांना च पायदळी तुडवले जात आहे. शहरातील देशी-विदेशी दारूची विक्री जोमाने सुरू आहे प्रत्यक्षात मात्र, सकाळी तांबडे फुटत नाही तोच दारू पिणाऱ्या तळीरामांची सोय होताना दिसत आहे. संबंधित दारूच्या दुकानाला वेळेचे बंधन असले पाहिजे मात्र स्थानिक पातळीवरील उत्पादन शुल्क विभागाचे याकडे होणारे दुर्लक्ष म्हणा किंवा आर्थिक संबंधांचा परिणाम, सकाळपासूनच शहरात राजरोसपणे दारू ची विक्री केली जात असल्याचे दिसून येते.

सामान्यांना कायद्याचा धाक दाखवणारे स्थानिक पोलिस मात्र देशी दारू दुकानांविरोधात कारवाई करताना 'डगमगताना' दिसत आहेत. यामुळे सामान्यांना दारू च्या जाचाला सामोरे जावे लागत आहे. कुठलाही परवाना नसताना केवळ दुकानाच्या नावाखाली महाराष्ट्र अंडा सेंटर या ठिकाणी खुल्याआम दारू पिऊन तरुण पिढी उध्वस्त होण्यासाठी कारणीभूत ठरू लागली पोलीस प्रशासनाला या अंडा सेंटरच्या माध्यमातून उघडपणे सुरू असलेली दारू आव्हान आहे त्यामुळे मद्यधुंद अवस्थेत असणारे दारुडे थेट कपडे काढणे, उघड्या स्वरूपात झोपणे, लोकांच्या घरात जाणे, जास्त प्रमाणात दारु पिऊन त्या ठिकाणी धुडगूस घालत वाद विवाद होणे, अशा प्रकाराला तेथील स्थानिक इस्लामपुरा, सावता नगर भागातील लोकांनाही राजरोजपणे दारुड्या लोकांचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे बालवाडी ते प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकणार्या विद्यार्थ्यांच्या कानी अशा शिव्या पडून त्यांच्या मनावरही परिणाम होत असल्याचे वारंवार दिसले दारू पिणारे सर्रासपणे दारू विकत घेऊन रस्त्यावरच ते पिताना दिसतात. काही दारू पिणारे रस्त्यावरच धुमाकूळ घालत शिवीगाळ करीत असल्याची तक्रारही ये-जा जाणार्या वृद्ध महिला, ज्येष्ठ नागरिकांनी केली आहे.

## ◆ संपादकीय

## भारताच्या पदक विजेत्यांवर होणार पैशांचा वर्षाव, सरकारकडून मोठी घोषणा..!




भारताच्या खेळाडूंनी नुकत्याच पॅरिस येथे झालेल्या पॅरालिम्पिक खेळांमध्ये शानदार कामगिरी करताना २९ पदके जिंकताना पदकपालिकेत १८ वे स्थान राखले. यापूर्वी झालेल्या टोकियो पॅरालिम्पिक खेळामध्ये भारताने १९पदके जिंकली होती. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताने आतापर्यतच्या पॅरालिम्पिक इतिहासातील सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली आहे. खेळाडूंच्या चमकदार कामगिरीला सन्मानित करण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने विविध बक्षिसांची घोषणा आज करण्यात आली. पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना ७५ लाख, रौप्य पदक मिळविणाऱ्या खेळाडूला ५० लाख तर कांस्य पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना २५ लाखांचे बक्षीस केंद्र सरकारच्या वतीने देण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय क्रीडा मंत्रा मनसुख मांडविया यांनी केली. मिश्र प्रकारात पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना ही रक्कम विभागून मिळणार आहे. पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी ७वर्ण, ९ रौप्य व १३ कांस्य पदकांची कमाई केली होती. खेळाडूंना त्यांच्या कामगिरीनुसार ही रक्कम अदा करण्यात येणार असल्याचाही क्रीडामंत्री मांडविय यांनी बोलताना सांगितले. भारतीय संघाने पॅरालिम्पिक व ऑलिम्पिक या दोन्ही ठिकाणी चांगली कामगिरी केली होती. २०२८ साली लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या दोन्ही स्पर्धासाठी खेळाडूंना पूर्ण समर्थन व सुविधा उपलब्ध करून देण्याचे क्रीडामंत्र्यांनी मान्य केले. सन २०16 मध्ये भारताने ४ पदके, टोकियोमध्ये १९ पदके व पॅरिसमध्ये २९ पदके जिंकताना भारताचा आलेख उंचावत असल्याचे मांडविय म्हणाले.

सात खेळाडूंची सुवर्णकामगिरी

पॅरा थलीट मुरलीकांत पेटकर यांनी १९७२ मध्ये पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताला पहिले पदक मिळवून दिले होते. मुरलीकांत पेटकर हे तेच खेळाडू आहेत ज्यांच्या जीवनावर 'चंदू चॅम्पियन' हा चित्रपटही नुकताच प्रदर्शित झाला आहे. पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये भारताला पहिले पदक नेमबाज अवनी लेखरा हिने जिंकून दिले, जे सुवर्ण पदक होते. यानंतर नितेश कुमार (बॅडमिंटन), सुमित अँटिल (थलेटिक्स,भालाफेक), हरविंदर सिंग (तिरंदाजी), धरमबीर (थलेटिक्स,क्लब थ्रो), प्रवीण कुमार (थलेटिक्स, उंच उडी) आणि नवदीप सिंग (थलेटिक्स,भालाफेक) यांनीही सुवर्णयश मिळविले.

# पेठ बीड गणेशोत्सवातील देखावे वेधनार बीडकराचे लक्ष

## गणेश भक्तांनी देखाव्याचा लाभ घ्यावा: अमृत सारडा , चौहान, गायकवाड, बन्सोडे

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीड भगातील विविध गणेश मंडळांच्या गणेशोत्सवातील लक्ष वेधून घेणाऱ्या देखाव्याला अनेक वर्षाची अनोखी अशी परंपरा आहे. बीडकरांनी दोन वर्षापासून दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा विविध गणेश मंडळांचे मनोबल वाढवणारा ठरला, त्यामुळे पेठ बीड भागातील देखाव्याच्या परंपरेला पडलेला खंड हा मोडीत निघाला असून पेठ बीड भागातील देखाव्याची अनोखी परंपरा पुन्हा दिसू लागली आहे. त्यामुळे याही वर्षी पेठ बीड भागातील गणेशोत्सवातील विविध देखावे हे याही वर्षी बीडकरांचे लक्ष वेधनार आहेत. बीड शहरासह जिल्हाभरातील गणेश भक्तांनी पेठ बीड भागातील विविध गणेश मंडळांचा देखावा पाहण्याचा लाभ घेवून गणेश मंडळाचे मनोबल वाढवावे असे आवाहन पेठ बीड शहर विकास कृती समिती/उत्सव समिती संस्थापक अध्यक्ष अमृत काका सारडा व समिती सदस्य, तसेच

अशोक घोडके, राम कदम, अक्षय ईगडे, राणा चौहान, किसन चौहान, पवन लड्डा, पपू देशमाने, ओंकार बन्सोडे, कुंभेश्वर विभुते, गणेश भरणाळे, निखील शेटे, पशुपती शेटे, ऋषिकेश सपकाळ, प्रम ोद मगर,दत्ता पाबळे, जानकीराम दोडमिसे, संतोष कपाळे , प्रज्योत कोटेच्या, हनुमान सूत्ळे.,अशोक राऊत, रतन सोनटक्के, सुरज चुगडे, लक्ष्मण शेणकुडे, अतुल गडगीले, बाळासाहेब पवार, आसाराम गायकवाड, दादा हातांगळे, विठल जाधव, सुशील जाधव, गणेश गायकवाड यांनी केले आहे.

### ● गणेश मंडळाचे नाव व देखावा

▶ राष्ट्रीय गणेश मंडळ काळा हनुमान ठाणा.
देखावा : ज्वाला सूराचा वध.
▶ महाराणा प्रताप गणेश मंडळ.
देखावा : खंडोबाचा जागरण गोंधळ.
▶ दत्तात्रय गणेश मंडळ साळगल्ली
देखावा : शिव तांडव.
▶ आझाद हिंद गणेश मंडळ
बुरुडगल्ली.
देखावा : गड आला पण सिंह गेला.
▶ वीरशैव गणेश मंडळ माजलगावकर मठ.
देखावा : उज्जैन महाकाल दर्शन.
▶ मनोकामना गणेश मंडळ शनिवार पेठ.
देखावा : बद्रीनाथ धाम.
▶ छत्रपती जाणता राजा गणेश मंडळ पुनम गल्ली.
देखावा : श्रीराम जन्मभूमी आयोध्या.
▶ राजे संभाजी गणेश मंडळ लोणारपुरा
देखावा : आदीयोगी महादेव मंदिर.
▶ स्वराज्य गणेश मंडळ.
देखावा : अमरनाथ गुफा
▶ न्यू समर्थ गणेश मंडळ शुक्रवार पेठ.
देखावा : वैष्णोदेवी गुफा दर्शन.
▶ ओझार गणेश मंडळ मोंढा.
देखावा : भुताची पालखी.
▶ नवरंग गणेश मंडळ.
देखावा : म्युझिकल फाउंटेन संगीत कारंजे.
▶ न्यू गणेश मंडळ विठ्ठल मंदिर चौक.
देखावा : भव्य दिव्य बालाजी मंदिर.







*बीड मंगळवार दिनांक १० सप्टेंबर रोजी घरोघरी गौर यांचे थाटात आगमन झाले.*

## लोकरत्न पुरस्कार सोहळा २०२४ विविध मान्यवरना जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

देशभक्त,पद्मश्री, डॉ. रत्नाप्पा कुंभार यांच्या जयंती निमित्ताने दरवर्षी प्रमाणे या वर्षी विविध विभागात उल्लेखनीय कार्य ज्यांचे आहे. त्यांना लोकरत्न पुरस्कार ने सन्मानित केले जाणार आहे .१५ सप्टेंबर २०२४ रोजी रविवार सकाळी ११ वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे होतं आहे.या कार्यक्रमास उदघाटक म्हणून मा. श्री धनंजय मुंडे साहेब बीड जिल्हा पालकमंत्री तथा कृषी मंत्री,तसेच प्रमुख पाहूणे म्हूणन लाभणार आहेत. बीड चे जिल्हा मा.पोलीस अधीक्षक, बीड, मा.जिल्हाधिकारी साहेब , मा.श्री रवींद्र तोंडे कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग बीड, मा.श्री महेश भाऊ शिंदे प्रदेश उपाध्यक्ष -राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित दादा गट , मा.श्री कल्याणराव आखाडे संस्थापक अध्यक्ष सावता परिषद,तथा प्रदेश अध्यक्ष ओ. बी. सी. सेल राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, मा. श्री सतीश दादा दरेकर, प्रदेश कार्याध्यक्ष बारा बलुतेदार महासंघ मा.श्री दत्ताभाऊ डाळजकर राष्ट्रीय अध्यक्ष माती कला बोर्ड,मा. श्री कल्याण दळे प्रदेश अध्यक्ष बारा बलुतेदार महासंघ, मा. श्री मोहन जगदाळे राष्ट्रीय अध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था , मा. श्री अनिरुद्ध सानप गट विकास अधिकारी पं. स. बीड, मा. श्री ज्ञानेश्वर भागवत प्रदेश अध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था.मा. श्री.विनायक राऊत, प्रदेश सचिव महाराष्ट्र कुंभार समाज महासंघ. यांच्या हस्ते लोकरत्न पुरस्कार दिल्या जाणार आहे. यामध्ये१. मा. श्री. बाजीराव चव्हाण,२.मा. श्री. डॉ. राजेंद्र सानप, ३.मा.श्री. प्रा.जोगेंद्र गायकवाड, ४.मा. चिं सचिन धस, ५.मा. श्री डॉ. विलास पाठक, ६.मा. श्री.प्रतापसिंग धंनूसिंग परदेशीं,७.मा. श्रीमाती .देशमुख जरीना अहमद पाशा, ८.मा.सौ.म नीषा पवार,९. मा. सौ.मंगल गोरे, १०.मा. श्री.प्रा. हर्षल केकाण, मा. ११.श्री.वासुदेव मिसाळ,१२.मा. श्री रवींद्र देवनरवाडे, १३. मा. श्री.बालाजी मनगिरे,१४.मा. श्री.बहिर भारत,१५.मा. सौ. सत्यभामा चोले,यांना जाहीर करण्यात आला आहे. सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होतं आहे.या कार्यक्रमांस मा. श्री रामदास कुंभार प्रदेश कार्याध्यक्ष आ. मा. कुं. स. वि. संस्था तथा प्रदेश अध्यक्ष( तएउउख )._लोकशाही पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत (बीबी ) वैद्य , तसेच कुंभार समाज विकास संस्था बीड. बारा बलुतेदार महासंघ यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे.

## पत्रकारांच्या हस्ते खडकत चौक गणेश मंडळाची आरती संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथील खडकत चौक गणेश मित्र मंडळाच्या गणरायाचे आरतीचे आयोजन पत्रकारांच्या हस्ते करण्यात आले होते यावेळी सर्व पत्रकार यांच्या उपस्थितीत श्रीगणेशाची आरती करण्यात आली.



यावेळी जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे , सरपंच परिषदेचे राज्य अध्यक्ष दत्ता काकडे , शरद रेडेकर, अविनाश कदम, अविशांत कुम कर, प्रवीण पोकळे, गणेश दळवी, राजे संभाजी उद्योग समूहाचे अध्यक्ष अमोल राजे शिंदे,सतीश जगदाळे चेअरमन यांच्या हस्ते आरती करण्यात आली यावेळी पत्रकार राजेंद्र लाड, शेख निसार, जावेद पठाण, अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, अण्णासाहेब साबळे, शेख समीर यांच्यासह ,खडकत चौक गणेश मित्र मंडळाचे बिबीशन भवर सरपंच ,कृष्णा तवले अध्यक्ष ,राहुल सोले उपाध्यक्ष अक्षय सुपेकर सचिव ,विनायक पन्हाळकर, रामदास खिळे, प्रकाश शिंदे, परम ेश्वर शेवाळे ,सलीम पठाण ,गौरव केरूळकर ,ओंकार केरूळकर ,निहाल पठाण ,शाहरुख पठाण ,जालिंदर कुमकर, सागर खोसे रितेश बोराडे, रोहित वांढरे,मोहन पन्हाळकरलक्ष्मण पांडुळे आदी उपस्थित होते.



*ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान द्वारे आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सव अंतर्गत आज आयोजित प्रसिद्ध अभिनेत्री तथा लोकसभा खासदार हेमामालिनी यांच्या प्रमुख भूमिकेतील संगीत नाट्य 'राधा रासबिहारी' मधील क्षणचित्रे.*

पान १ वरून पुढे...

## आ.क्षीरसागरांची...

वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित आहे. मागील वर्षी रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथे भुस्खलन होऊन मोठी दुर्दैवी घटना घडली होती. याचसारख्या घटनेची पुनरावृत्ती पुन्हा आपल्याकडे होऊ नये याची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे. इर्शाळवाडी घटनेसारखा अनर्थ टाळायचा असेल तर, कपीलधारवाडी येथे प्रशासनाकडून तातडीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात तसेच या भागाचा पुनर्वसनाचा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली.

पान ४ वरून पुढे...

## एएससी कंपनीकडून...

आर्थिक व्यवहार झालेला आहे त्या व्यक्तींपैकी अनेक जण उजळ माथ्याने फिरत आहेत..त्यांच्यावर सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांची मेहरबानी दिसून येत आहे.. सायबर विभागातील एक अधिकारी अनेक दिवसांपासून त्या ठिकाणी कार्यरत असून त्याची माहिती मी घेत आहे ..

या गोरगरीब जनतेची फसवणूक करणाऱ्या व्यक्तींचा शोध होऊन त्यांना त्यांचे पैसे परत मिळवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात यावेत अन्यथा.. या सायबर विभागातील अधिकाऱ्यांची आपण राज्याच्या गृहमंत्र्याकडे तक्रार करणार आहोत असेही त्यांनी शेवटी सांगितले.

## तलवाडा कब्रस्तान..

अतिक्रमण हटविण्यासाठी १६ नोव्हेंबर २०२२ मध्ये पत्र दिलेले आहे. तरीही गेवराईचे तहसिलदार अजुन कोणतीच कार्यवाही करीत नसल्याने

गेवराई तहसिलदार यांना उपोषणा संदर्भात निवेदन देण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षापासून हा लढा सुरु आहे. आणखी किती वर्ष व कुठपर्यंत वाट पाहायची? असा प्रश्न उपस्थित करत तलवाड्यातील ग्रामस्थांनी दि. १० सप्टेंबर गेवराई तहसिल समोर कुटुंबियांसह उपोषण करण्याचा इशारा प्रशासनास दिला होता. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, मौजे तलवाडा येथील गट नंबर ५१० मधील कब्रस्तान तसेच दुसरे लहान मुलांचे कब्रस्तान आहे. त्या ठिकाणी मुस्लिम समाजातीलच काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. सदरील अतिक्रमण हटवावे, या मागणीसाठी तलवाड्यातील ग्रामस्थांनी

प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, गेवराई तहसिलदार यांना या बाबत आदेशही झालेले आहेत. दोन्ही कब्रस्तान तहसिलदार यांनी मंडळ अधिकारी व तलाठी पाठवून पंचनाम्याचे आदेश झाले होते. १७मे २०२२ रोजी मंडळ अधिकारी व तलाठ्यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर भेट देऊन पाहणी पंचनामा करुन गेवराई तहसिलला अहवाल दाखल केलेला होता. उपअधीक्षक भूमी अभिलेख गेवराई यांना तहसिलदारांना गट नंबर ५१० ची हद्दबंदी करुन मोजणी करुन तो अहवाल देखील तहसिल कार्यालयात दाखल करण्याचे आदेशित केलेले होते. हे दोन्ही अहवाल तहसिलला सादर झालेले आसतांना तरीही गेवराईचे

तहसिलदार संदीप खोमने हे तलवाड्यातील क्रबस्तानच्या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यास टाळाटाळ करत होते. त्या आणुषंगाने गावातील हजारो महिला पुरुषांनी गेवराई तहसिल समोर दि.१० सप्टेंबर रोजी कुटुंबियांसह गेवराई तहसिल कार्यालयासमोर बेमुदत उपोषण केले. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी भ्रमणध्वनी द्वारे मुस्लिम धर्मगुरुंशी संवाद साधत गेवराई तहसिल प्रशासनास अतिक्रमण पाडन्या संदर्भात आदेशीत केल्याने गेवराई तहसिल प्रशासनाने अतिक्रमण धारकांना सात दिवसाचे अल्टीमेटम देत लागलीच नोटीस काढत आसल्याचे लेखी पत्र आंदोलन कर्त्यांना देत सर्व राजकीय नेते मंडळी व सामाजिक कार्यकर्त्या समक्ष आंदोलनाची सांगता करण्यात आली. या उपोषणाला एमआयएम व जमिअत-उलेमा-ए-महाराष्ट्र बीड शाखेने पाठिंबा दिला आहे.

## भगवानबाबांनी मानवाच्या..

संतांच्या अभंग रुपी ज्ञानामुळे सुख, शांती व समाधान लाभते. संत वचनाने मानवी जीवनात ज्ञानाची भर पडत असल्याचे साठे महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून प्रतिपादित केले.

तुम्ही संत मायबाप कृपावंत! काय मी पतीत कीर्ती वाणु!!

या अभंगाद्वारे प्रबोधन करताना ऐश्वर्यसंपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या अध्यात्मिक कारकिर्दीचा त्यांनी उहापोह केला. साधुसंतांनी माणसाच्या जीवनात अध्यात्म व नामस्मरणाचे महत्त्व काय असते? हे आपल्या वाणी व अभंगातून विशद करून ठेवले आहे. त्यामुळेच वर्तमान व भविष्य काळात माणुसकी टिकून असल्याचे महाराजांनी सांगितले.

राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त बीड येथील हाडरोग तज्ञ डॉ गणेश केदार यांनी येथील आबाल वृद्धांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार केले. बडेवाडी परिसरातील शेकडो नागरिकांनी कीर्तन श्रवण व सर्व रोग निदान शिबिराचा लाभ घेतला. विराट मुंडे, विठ्ठल बडे, लहू बडे, बंडू बडे, रामहरी तिडके, ज्ञानेश्वर बडे, भरत बडे, लक्ष्मण बडे यांच्यासह सर्व बडेवाडी ग्रामस्थांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.

## गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या...

गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद बंदोबस्ताची तयारी केली आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या मनात पोलीस दलाविषयी विश्वासाची भावना निर्माण व्हावी, यासाठी पथसंचलन करण्यात आले आहे. यामध्ये पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके साहेब यांच्यासह तलवाडा पोलिस स्टेशनचे बहुतेक पोलीस अधिकारी सहभागी झाले होते.

## माजलगावात आमदार प्रकाश...

पप्पू धरपडे, संतोष यादव, शेषेराव जगताप, कचरू खळगे, पांडुरंग चांडक, प्रभाकर शेटे, ज्ञानेश्वर मेंडके, राजेश मेंडके, प्राचार्य सानप सर, संतोष जेथलिया, चंद्रकांत शेजुळ, दिलीप झगडे, परमेश्वर सोळंके, बन्सी मुंडे, सतीष रांजवन, दत्ता कांबळे, डॉ.यशवंत राजेभोसले, राकेश साळवे, भास्कर शिंदे, लालासाहेब तिडके, सिद्धार्थ ससाने यांची समितीच्या सदस्य पदी निवड करण्यात आली. अशा या भव्य सर्वपक्षीय नागरी सत्कार कार्यक्रम ाचे आयोजन लवकरात लवकर करण्यात येणार असल्याचे यावेळी सत्कार समितीचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी व सचिव अच्युत लाटे यांनी सांगितले.

## आरोग्यसेवेसोबत गणेशोत्सव...

यांनी केले आहे. आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात अधिकारी व कर्मचारी यांनी एकतंताय गणेश मंडळाच्यावतीने पाच दिवसांची श्री गणेशाची स्थापना करत मंगळवार (दि.१०) रोजी सकाळी ९.३० वा.आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे व पत्नी आरोग्यसेविका सौ.ज्योती प्रविण पोकळे सपत्नीक आरतीचा मान दिला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आष्टी ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.राहूल टेकाडे,डॉ.मस्तुद सर, संदीपान धस सर,सुधिर सोनवणे,वैभव येडे सर ,सरोदे सर,चंद्रकांत बोडखे,निकिता कोळी मॅडम,आकूजकर मावशी,वृषाली शिनगारे यांच्यासह आदि उपस्थित होते..

# स्वराज्य शक्ती सेनेच्या कार्यकर्ता मेळावा मध्ये हजारो लोकांची उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

गुरुवार दि. ५ सप्टेंबर रोजी 'स्वराज्य शक्ती सेना' च्या वतीने बीड शहरात श्री मंगलदास अर्बन मल्टिपल निधी लि. गेवराई या बँकेच्या शाखेचा उद्घाटन सोहळा व महिला सशक्तीकरणा करीता या बँकेतुन लवकरच गरजू महिलांना बीनव्याजी कर्ज दिले जाणार आहे. हा कार्यक्रम रामकृष्ण लॉन्स बीड येथे सकाळी पार पडला. यावेळी महिलांची गर्दी लक्षणिय होती. यावेळी राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार निशाना साधत स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ. करुणाताई धनंजय मुंडे म्हणाल्या की .... जो व्यक्ती आपल्या पत्नीला न्याय देऊ शकत नाही, तो जनतेला काय देणार..आपले भले बुरे जनतेनेच ठरवावे अशी वेळ आता येऊन



ठेपल्याचे त्यांनी सांगितले.

बीड शहरात सौ. करुणाताई धनंजय मुंडे यांनी धडाकेबाज कार्यक्रम घेऊन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. आज झालेल्या कार्यक्रमासाठी लातूर, धुळेसह मराठवाड्यातील अनेकांनी हजेरी लावली होती. यावेळी महिला व पुरूषांच्या प्रचंड गर्दीमुळे अनेकांचे धाबे दणाणले आहे. यावेळी जवळपास ९० पेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी 'स्वराज्य शक्ती सेना' पक्षात प्रवेश केला आहे.

### ● शेतकरी भिकेला लागला-

या कार्यक्रमात बोलताना त्या म्हणाल्या की....मी आयुष्यात खूप संघर्ष केला आहे. करत आहे. आपल्याकडे ज्या विकासाच्या गप्पा केल्या जातात त्या निव्वळ भुलथापा आहेत. परळीत पावसाळ्यात अनेक पुल वाहून गेले. जवळपास सगळ्याच गावातील पुलाची हीच अवस्था आहे. त्यातूनच बोगसगिरी उघड होते. कृषीमंत्र्यांच्या गावातच अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचले. आहे ती पिके सडून गेली. पिक विमा मिळत नाही. शेतकरी भिकेला लागला आहे. त्यांना मदत मिळत नाही. शेतकऱ्यांचे घर उघड्यावर पडले आहे. आता झोपेतून जागे होऊन पिकांची पाहणी केली जात आहे. ही शेतकऱ्यांची क्रुर चेष्टा आहे. खर तर .... जी व्यक्ती आपल्या पत्नीला न्याय देऊ शकत नाही, तो जनतेला काय देणार? तो बीडच्या युवकांचे काय भविष्य बनवणार? बीडचे काय भले करणार? याचा विचार जनतेने करायचा आहे.

### ● तब्बल ३०० कोटींचा महाघोटाळा-

कृषी विभागात तब्बल ३०० कोटींचा महाघोटाळा झाल्याचा गौप्यस्फोट सौ. करुणाताई धनंजय मुंडे यांनी यावेळी केला. या घोटाळ्याची सखोल चौकशी झाली पाहिजे अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. हे सगळे थांबवायचे असेल तर येत्या विधानसभे साठी आपण 'स्वराज्य शक्ती सेना' चे उमेदवार उभे करणार आहोत. त्यांना निवडून द्या..मी तुम्हाला वचन देते की तुम्हाला जेवढा विकास निधी उपलब्ध होणार आहे तो संपूर्ण विकासासाठी, तुमच्या सेवेसाठीच खर्च केला जाणार आहे. विकास निधी कसा खेचून आणायचा आहे ते मला चांगलेच माहिती आहे, त्याची चिंता तुम्ही करू नका.

### ● जनतेसाठी मैदानात उतरले -

एका व्यक्तीसाठी मी आपले सगळे आयुष्य पणाला लावले. घर सांभाळून मी त्यांना मंत्री कसे करता येईल यासाठी झटले. सुःख दुःखात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिले. सत्ता, सुख, संपत्ती मिळताच माझे अस्तित्वच नाकारण्यात आले तेव्हा मी माझ्या अधिकारासाठी बंड केले. मला कशाचीही लालसा नाही. मी बाहेर पडले तेव्हा सर्वस्व पणाला लावून जनतेसाठी मैदानात उतरले आणि मला मोठ्या प्रमाणात जनतेचे प्रेम मिळत आहे. मला जनतेने संधी दिली तर मी विश्वास नक्कीच सार्थकी लावल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही निवडून दिलेले आमदार हे तुमचे हक्काचे असतील. तुमची सेवा करणारे असतील याचां विश्वास, असा शब्द मी या ठिकाणी तुम्हाला देते.

### ● महिला स्वाभिमानाने जगू शकतील-

मी एक स्त्री आहे. एक स्त्री दुसऱ्या स्त्रीचे दुःख समजू शकते. समाजात जगण्यासाठी, घर चालवण्यासाठी महिलांना काहीतरी व्यवसाय करता यावा, त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी आम्ही बिनव्याजी कर्ज योजना घेऊन येत आहोत. त्यामुळे महिलांना कर्ज फेडण्यासाठी भरमसाठ व्याज भरण्याचा धाक राहणार नाही. त्यामुळे महिला स्वाभिमानाने काम करून जगू शकतील.

आज महाराष्ट्रात स्त्री सुरक्षित नाही. मुली सुरक्षित नाही. आपल्याला स्वतःची सुरक्षा स्वतःच करावी लागणार आहे. त्यामुळे जागरूक रहा, सतर्क रहा, आपली एकजूट वाढवा, असेही करूणाई मुंडे म्हणाल्या.



*बीड शहरातील जिजाऊ नगर शिराळे नगर येथील श्री गणेशाची आरती करताना व भाविक भक्तांना शुभेच्छा देताना माझी सभापती नवनाथांना शिराळे पाटील दत्ता भाऊ थिगळे प्रभाकर कवडे धांडे भैय्या इत्यादी फक्त गण.*

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज १२८७ / २०२४**
**प्रकाश पि. लक्ष्मण घरत व इतर विरुध्द निरंक**
**अॅड. एस एस महाजन यांच्या मार्फत**

**अर्जदार :–** १. प्रकाश पि. लक्ष्मण घरत, वय – ५५ वर्षे, धंदा – शेती रा. महाजनवाडी, ता. जि. बीड. २. बंडु पि. लक्ष्मण घरत, वय – ६० वर्षे, धंदा – शेती, रा. सदर. ३. विठ्ठल पि. लक्ष्मण घरत, वय – ७३ वर्षे, धंदा – शेती रा. सदर. ४. नागराबाई प्र. मल्हारी हिंदोळे, वय – ७८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. सदर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :–** १. साहेबराव पि. लक्ष्मण घरत, वय – ८४ वर्षे, बंदा – शेती रा. महाजनवाडी, ता. जि. बीड. २. काकासाहेब बापुराव घरत, वय – ४० वर्षे, धंदा – शेती, रा. सदर. ३. नारायण पि बापुराव घरत, वय – ४२ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर. ४. त्रिंबक पि बापुराव घरत, वय – ४५ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर. ५. पारुबाई भ्र. विठ्ठल मकाळ, वय – ४४ वर्षे, धंदा – शेती रा. वैदयकीनी, रा. पाटोदा, जि. बीड. ६. मुक्ताबाई भ्र.पांडुरंग घरत, वयं ७२ वर्षे, धंदा – शेती रा. महाजनवाडी, ता. जि. बीड. ७. सखाराम पि. पांडुरंग घरत, वय ४७ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर . ८. कलावती भ्र. सुमती काटवटे, वय – ४९ वर्षे, धंदा – घरकाम, रा. अंजनवती ता. जि. बीड. ९. जिजाबाई भ्र. भिमराव काटवटे, वय – ५१ वर्षे, धंदा – घरकाम, रा. सदर. १०. द्रोपती भ्र. हरिदास गायकवाड, वय – ५३ वर्षे, धंदा – घरकाम, रा. जगदाळे वस्ती, खर्डा रोड, जामखेड ता. जामखेड, जि. अहमदनगर, ११. सुदामती भ्र. लहु मंडलिक, वय – ५५ वर्षे, धंदा – घरकाम, रा. नफरवाडी, ता. पाटोदा जि. बीड. १२. जालिंदर पि. गंगाराम जाधव, वय – ६० वर्षे, धंदा – शेती रा. महाजनवाडी, ता. जि. बीड, १३. बाबु पि. गंगाराम जाधव, वय – ५८ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर, १४. अनुसया भ्र.रामकिसन घरत, वय – ६२ वर्षे, धंदा – घरकाम, रा. सदर, १५. कौसा भ्र. महादेव कदम, वय – ५९ वर्षे, धंदा – घरकाम, रा. सदर, १६. सुशाला भ्र. मुकेश जोगदंड, वय – ५५ वर्षे, धंदा – घरकाम , रा. देवीबाभळगाव ता. जि. बीड. १७. बंडु पि. चंदु जाधव, वय ३५ वर्षे, धंदा – शेती, रा. महाजनवाडी, ता. जि. बीड. १८. बालाजी पि. चंदु जाधव, वय – ३३ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर, १९. मंडु भ्र. गणेश मुंडे, वय – ३१ वर्षे, धंदा – शेती, रा. पाचंग्री ता. पाटोदा जि. बीड, २०. कविता भ्र. सचिन नांदे, वय – ३० वर्षे, धंदा – शेती, रा. मंझेरी, ता. पाटोदा जि. बीड, २१. मिना प्र. विनोद पवार, वय – २८ वर्षे, धंदा– शेती रा. लिपाणी ता. भुम जि. उस्मानाबाद ( धाराशीव)

**(अर्जदार व गैरअर्जदार हे भारतीय आहेत)**

**मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात लक्ष्मण पि. दिना घरत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **लक्ष्मण पि. दिना घरत** यांचा मृत्यु दिनांक ०८/०७/१९७१ रोजी महाजनवाडी, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ ते ३ व गैरअर्जदार क्र १ हे मयातचे मुले आहेत. अर्जदार क्र ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. तसेच गैरअर्जदार क्र. २,३,४,७,१२ व १३ हे मयताचे नातु आहेत. गैरअर्जदार क. ५.८,९,१०,१११४, १५ व १६ या मयताच्या विवाहीत नाती आहेत. गैरअर्जदार क्र ६ ही मयताची सुन असुन गैरअर्जदार क्र १७ व १८ हे मयताचे पंतु आहेत. गैरअर्जदार क्र १९ १९, २० व २१ या मयताच्या विवाहीत पंत्या आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत लक्ष्मण पि. दिना घरत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १० सप्टेंबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १० ऑक्टोबर २०२४.**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

---

## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. बागल, ८ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३०८ / २०२४**
**अँड वाय आर शेळके यांच्या मार्फत**
**निर्मला व इतर वि. निरंक**

ज्यापेक्षा मधुकर आश्रुबा खाडे हे दिनांक २४/०६/२०२४ रोजी रा. धावज्याचीवाडी ता. जि. बीड मयत झाले आहेत. आणि तसेच अर्जदार–

१. निर्मला मधुकर खाडे, रा. संत नामदेव नगर (पुर्व), बाळराजे नगर, पालवण रोड, बीड ता.जि.बीड
२. भाग्यश्री मधुकर खाडे, रा. सदर
३. अमोल मधुकर खाडे, रा. सदर
४. अभिजीत मधुकर खाडे, रा. सदर

अर्जदार क. १ ही मयत **मधुकर आश्रुबा खाडे** पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी असून, अर्जदार कं ३ व ४ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आईवडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू **मयत मधुकर आश्रुबा खाडे** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**पु. ता. १४/१०/२०२४**

आज दिनांक ०९ सप्टेंबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, बीड

---


Aditya Education Trust's
**Aditya College of MBA**

Sarda Estate Nalwandi Road, Beed - 431 122.
DTE Code 2104
Approved by AICTE New Delhi, DTE Mumbai, Govt. of Maharashtra & Affiliated to Dr. BAMU Aurangabad.
Contact: 9028060254 Email ID: aditya7mba@gmail.com

Applications are invited from eligible & interested candidates for MBA Admission to First Year at Institute Level for Vacant Seats after CAP Round.

**Schedule of Activities**

| Sr.No. | Activities | Schedule |
|---|---|---|
| 1 | Registration Start | 10/09/2024 |
| 2 | Display of Merit List | 10/09/2024 Till 03:00 pm |
| 3 | Commencement of Admission | 10/09/2024 03:30 pm onwards |

If any seat remains vacant additional round will be conducted & schedule will be displayed on College Notice Board. Eligibility as per rules & regulations prescribed by State Common Entrance Test Cell Mumbai and Government of Maharashtra.

Director


## टी सी हरवला आहे.

अश्विनी अभिमान करांडे या नावाचा इयत्ता १० वी चा टि.सी वडवणी ते बीड प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क मो.न. ९०१११४५४७१**

## टी सी हरवला आहे.

शिंदे बाळू रमेश या नावाचा इयत्ता १२ वी पासाचा टी.सी. बीड ते नाथापूर बस प्रवासामध्ये हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क मो.न. ९५११३५१५२१**

---

# स्वराज्य महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड.

**मुख्य कार्यालय : जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नगर रोड, बीड**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

**जा.क्र.एस.बी.एस.वा.सभा/२०२४–२५** **दिनांक १०/०९/२०२४**

स्वराज्य महिला नागरी सभा गुरूवार दि. २७/०९/२०२४ रोजी ११.३० वा शाखा १ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नगर रोड, बीड या ठिकाणी अध्यक्ष सौ. शिंदे शुभांगी अशोक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेला उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :-**

१. मागील वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२. संचालक मंडळाने सादर केलेला ३१ मार्च २०२४ अखेरचा वार्षिक अहवाल नफा– तोटा पत्रक, तेरिज पत्र, व ताळेबंद पत्रकाचे वाचन व त्यास मान्यता देणे.
३. आर्थिक वर्षे २०२३–२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालास मान्यता देणे.
४. आर्थिक वर्षे २०२३–२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण मधील दोष दुरूस्ती अहवास मान्यता देणे.
५. आर्थिक वर्षे २०२३–२४ वर्षातील नफा विभागणीस मान्यता देणे.
६. आर्थिक वर्षे २०२३–२४ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त आलेला जमा खर्च मंजूर करणे.
७. आर्थिक वर्षे २०२३–२४ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
८. आर्थिक वर्षे २०२३–२४ च्या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखा परिक्षकांची नियुक्ती करून मानधन निश्चित करणे.
९. एक रक्कमी कर्ज (समिचार) परतफेड योजना संचालक मंडळाने स्विकारलेल्या निर्णयाची नोंद घेणे व या अंतर्गत मंजुर केलेल्या प्रकरणाची नोंद घेणे.
१०. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती प्रमाणित करणे.
११. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने एनवेळी येणाऱ्या विषयावर निर्णय घेणेबाबत.

**विशेष सुचना : -**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम क्र. २२(क) प्रमाणे आवश्यक असणारी गणसंख्या सभेच्या कामकाजाच्या प्रारंभी नसेल तर सभेचे कामकाज अर्धा तास तहकुब करण्यात येईल. नंतर त्याचे ठिकाणी कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे सभेचे कामकाज सुरू केले जाईल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२. कोणत्याही सभासदास संस्थेचा कामकाजाविषयी काही प्रश्न विचायवयाचे असल्यास दि. २०/०९/२०२४ पुर्वी संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील अशा रितीने लेखी स्वरूपात पाठवावे. त्यानंतर विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. यांची नोंद घ्यावी.

**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**स्वाक्षरित**
**सौ. शिंदे शुभांगी अशोक,**
**अध्यक्ष /**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**स्वराज्य महिला नागरी सहकारी पतसंख्या मर्या. बीड**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, शिरुर का. यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १८२ / २०२४**
**कडुबाई व ईतर विरुध्द निल**
**अॅड. एच. एस. कोठुळे यांच्यामार्फत**

**अर्जदार –** १) कडुबाई भ्र. रावसाहेब चांदणे वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. आनंदगाव, ता. शिरुर (का), जि. बीड. २) केरु पि. रावसाहेब चांदणे वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. मो. नं. ९०२२४४०१२८. ३) चंद्रकांत पि. रावसाहेब चांदणे वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ४) कमळ भ्र. सुदाम पवळ वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. औरंगपुर, ता. शिरुर का., जि. बीड,

**विरुध्द निल**

**अर्ज –** बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जि. बीड, यांचा ज्यापेक्षा **मयत नामे रावसाहेब पि. यादव चांदेणे, रा. आनंदगाव, ता. शिरुर का., मृत्यु दिनांक दि. २२/०३/२०२४ रोजी आनंदगाव, ता. शिरुर का., जि. बीड,** येथे मयत झाले असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मुले असुन अर्जदार क्र. ४ हि मयताची विवाहीत मुलगी आहे. तसेच अर्जदार हे उपरोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत, असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे सदरहु तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०४/०९/२०२४ रोजी माझ्या सहिने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारीख – २३ /०९/२०२४**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर

---

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, कु.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक – १२८५/२०२४**
**( मार्फत विधिज्ञ श्री एम डी धांडे)**

अर्जदार :– १. शकुंतला शेषेराव गायकवाड, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. एम.आय.डी.सी. हनुमान नगर, बीड, ता. जि. बीड.२.महेंद्र शेषेराव गायकवाड, वय २७ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ३. शिवानी शेषेराव गायकवाड, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ४. तृप्ती विकास साबळे, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. वीर वस्ती, मांडवा, ता. जि. बीड,

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **शेषेराव दगडूबा गायकवाड हे / या दि. ०७/०८/२०२४ रोजी कृ**ष्णा हॉस्पीटल, बीड, ता.जि.बीड येथे मयत असुन अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार के २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार के ३ व ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत यावी जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज दिनांक– ०९/०९/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. **पुढील तारीखः– १७/१०/२०२४.**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व .स्तर,बीड






दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

# मराठवाडा पत्र

● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. ११ सप्टेंबर २०२४ ● पान ४







# एएससी कंपनीकडून गरीबांचे पैसे परत मिळवण्यासाठी सायबर विभागाने कारवाई करावी

## अन्यथा सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांची गृहमंत्र्यांकडे तक्रार करणार : माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचा इशारा

**आष्टी । प्रतिनिधी**

एएससी या कंपनीने ऑनलाइन व्यवसाय द्वारा मासे विक्री आणि इतर प्रकारचे व्यवसाय अधिक पैसे मि ळवण्याचे आमिष दाखवून गोरगरीब, छोटे-छोटे व्यवसायिकांना लुटले असून या व्यवसायिकांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी बीड जिल्हा सायबर क्राईम सेलचे अधिकाऱ्यांनी अधिक कार्यक्षमतेने आणि कठोरपणे कारवाई करण्याची आवश्यकता आहे..अशी जनतेची अपेक्षा असून. त्यानुसार जिल्हा पोलीस दलातील सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा या संबंधित अधिकाऱ्यांची तक्रार आपण उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहोत असा इशारा माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी दिला ..



आष्टी पोलीस स्टेशन मध्ये पत्रकारांशी ते बोलत होते..ते पुढे म्हणाले, एएससी या ऑनलाईन कंपनीद्वारे छोट्या व्यवसायिकांना मासे विक्री व्यवसायातून अधिक नफा मिळवण्यासाठी ऑनलाईन पैसे गुंतवण्याचे आमिष दाखवण्यात आले.. त्यामध्ये तालुक्यातील १२०० ते १४०० लोकांचे प्रत्येकी ५ ते १० लाख रुपयापर्यंतची गुंतवणूक झाली असून आता त्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाली आहे. त्यातील अनेक व्यवसायिकांनी व्याजाने पैसे काढून गुंतवणूक केल्यामुळे आज त्यांच्यावर फाशी घेण्याची वेळ आलेली आहे.. त्यामुळे सायबर क्राईम विभागाकडे काळे नावाच्या व्यक्तीने याबाबत रितसर फिर्याद दाखल केली असून त्या फिर्यादीनुसार संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी.. आणि या गोरगरीब व्यवसायिकांचे पैसे मिळवण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलातील सायबर क्राईम विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक कार्यक्षमते आणि प्रामाणिकपणे काम करण्याची आवश्यकता आहे असे सांगत ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातील महादेव प या महा घोटाळ्यातील नऊ नऊ अब्ज रुपये ज्या व्यक्तींच्या नावावर ➧ (उर्वरित पान २ वर)

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या समारंभाची पूर्वतयारी बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाच्या समारंभाची पूर्वतयारी बैठक निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात पार पडली. या बैठकीस उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) शैलेश सुर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार चंद्रकांत शेळके, अविनाश सिंटे, नायब तहसीलदार माधव काळे आणि संबधित विभागाचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम ध्वजारोहणाच्या कार्यक्रमासंबधी सर्व संबधित विभागास कार्यक्रमाच्या पुर्वतयारीसाठी सूचना दिल्या तसेच दि. १६ सप्टेंबर व १७ सप्टेंबर रोजी रात्री कार्यक्रम ास्थळी रोषनाई करण्यात यावी, अशा सूचनाही निवासी उपजिल्हाधिकारी यांनी यावेळी संबधित यंत्रणेस दिल्या.

## गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा असल्याने यंत्रणेने सज्ज राहावे : जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा असल्याने यंत्रणेने सज्ज राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिले. जिल्हाधिकारी यांनी सोम वारी सायंकाळी प्रगती सभागृहात दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून गोदावरी नदीकाठच्या गांवाना सतर्कतेच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तसेच दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. जायकवाडी प्रकल्प, नाथसागर जलाशय, पैठण येथुन गोदावरी नदीपात्रात सांडव्याद्वारे विसर्ग सुरू करण्यात आल्याने नदी काठच्या गावात आवश्यक उपाययोजना करण्यासाठीच्या सुचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. यातंर्गत जायकवाडी प्रकल्प येथुन गोदावरी नदीपात्रात विसर्ग सुरू केल्यामुळे पिण्याचे स्त्रोत दुषीत झाल्यास पाणी पुरवठ्याचे शुद्धीकरण करणे, गरज पडल्यास टैंकर लावणे बाबत गटविकास अधिकारी, तहसीलदार यांनी तात्काळ उपाययोजना कराव्यात, तसेच तालुका आरोग्य अधिकारी, ग्रामिण रुग्णालय यांच्या सोबत संपर्क ठेवून कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव वाढणार नाही याकडे लक्ष देण्यात यावे. तसेच या कालावधीत नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी पोहोच होईल याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देशित केले. अत्तिवृष्टीमध्ये सापांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने सर्पदंश, डेंग्यूची लागण तसेच पावसाळ्यात उद्भवणाऱ्या रोगांकरीता इंजेक्शन, औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य येथे उपलब्ध राहील याची जिल्हा शल्यचिकित्सक, बीड व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दक्षात घेण्याच्या सूचना केल्या .

## पप्पूजी कागदे यांचा बीड जिल्हा दौरा रिपाइंकडून तालुकास्तरीय बैठकांचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने बीड शहरात केंद्रीय मंत्री नाम दार रामदासजी आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत (दि.५) ऑक्टोबर रोजी घेण्यात येणाऱ्या भव्य सत्कार सोहळ्याच्या पूर्व तयारीसाठी रिपाइंच्यावतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कांगदे यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुकास्तरीय बैठकांचे आयोजन खालील प्रमाणे करण्यात आले आहे. दि.१२ सप्टेंबर (गुरुवार) केज तालुका-११वाजता, अंबाजोगाई-१ वाजता, धारूर तालुका- दुपारी ३ वाजता, दि.१३ सप्टेंबर (शुक्रवार) गेवराई तालुका-११ वाजता, माजलगाव- १ वाजता, वडवणी दुपारी ४ वाजता, दि.१४ सप्टेंबर (शनिवार) शिरूर तालुका-११ वाजता, पाटोदा-१ वाजता, आष्टी तालुका-दुपारी ३ वाजता, दि.१६ सप्टेंबर (सोमवार) परळी तालुका-१२ वाजता, रिपाइंच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय बैठकांचे आयोजन तालुकाध्यक्षांनी वेळेवर करावे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे रिपाइंचे प्रसिद्धी प्रमुख विष्णू जोगदंड यांनी दिली आहे.

## आ.आजबे यांच्या प्रयत्नाला यश

### कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आष्टीला पाच कोटी ७५ लक्ष रुपयाचे कृषी भवनाला दिली मंजुरी: आ बाळासाहेब आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसाठी विविध योजना महाराष्ट्र राज्य कृषी विभागा अंतर्गत तालुका कृषी अधिकारी कार्यालय मार्फत राबवल्या जातात त्यासाठी एकाच छताखाली सर्व अधिकाऱ्यांचे कार्यालय असावे व शेतकऱ्यांची हेडसांड होऊ नये या बाबींची दखल घेत आ बाळासाहेब आजबे यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय व कृषी भवनासाठी कृषिमंत्री ना धनंजय मुंडे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता त्यास आज पाच कोटी ७५ लाख रुपयांच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली याबद्दल शेतकरी बांधवांच्या वतीने आपण उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषीमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे विशेष आभार मानण्यात आले आहेत.

आष्टी तालुक्यासाठी अद्यावत तालुका कृषी भवन असावे असे आपले स्वप्न आहे त्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याचे सूचित केले होते त्यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार कृषिमंत्री नामदार धनंजय मुंडे साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून ९ सप्टेंबर २०२४ रोजी कृषी विभागाच्या वतीने पाच





कोटी ७५ लाख रुपये च्या प्रशासकीय मान्यता आदेश काढण्यात आला आहे यामध्ये तालुका कृषी अधिकारी कार्यालय मंडळ अधिकारी कार्यालय व कृषी भवन शेतकऱ्यांसाठी या ठिकाणी सर्व सोईयुक्त असे कृषी भवन बांधण्यात येणार आहे याम ध्ये शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग व इतर संग्रहालयाचाही समावेश करण्यात येणार आहे ,शेतकऱ्यांसाठी झटणारे शेतकरी पुत्र म्हणून आमदार बाळासाहेब आजबे यांची ओळख असणारे कर्तव्यदक्ष आमदार आजबे यांनी पुन्हा एकदा शिक्का मोर्तब केले आहे, लवकरच या कामाची निविदा प्रसिद्ध होऊन कामास सुरुवात होणार आहे त्यामुळे अधिकाऱ्या बरोबरच शेतकऱ्यांना विविध सुविधा या एकाच छताखाली मिळणार आहेत शेतकऱ्यांसाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबवल्या जाणार असून त्यामध्ये सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे असे शेवटी आ. आजबे यांनी बोलतांना सांगितले.

## तलवाडा कब्रस्तान अतिक्रमण प्रकरणी गेवराई तहसीलने सात दिवसाचे अल्टीमेटम देत संबंधितांना लागलीच नोटिसा बजावल्या

**तलवाडा । प्रतिनिधी**

तलवाडा येथील मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने तलवाडा मुस्लिम कब्रस्तान अतिक्रमण प्रकरणी गेवराई तहसीलला म हिला पुरषासह हजारोंच्या संख्येने उपस्थिती दर्शऊन उपोषण करण्यात आले. या आंदोलनात मनसेचे राजेंद्र मोटे, गेवराई पत्रकार संघासह विजयसिंह पंडीत, युध्दाजित पंडीत, बदामराव पंडीत, पुजाताई मोरे. अँड सुरेश हात्ते यांच्या सह गेवराई शहरातील मराठा समाज बांधवांनी उपस्थिति दर्शवत जाहीर पाठींबा देत अतिक्रमण धारका विषयी कडवट प्रतिक्रिया व्येक्त करत प्रशासनास धारेवर धरले. या आंदोलनात मुस्लिम धर्मगुरुसह अँड शफिकभाऊ पत्रकार भागवतजी तावरे यांनी प्रशासनास खडे बोल सुनावत या आंदोलनात आम्ही सदैव सोबत आसल्याचे सांगीतले.

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील कब्रस्तानच्या जागेवर मुस्लिम समाजाच्याच काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. या संदर्भात गावातील लोकांनी हे अतिक्रमण उठविण्याच्या म ागणीसाठी गेल्या काही वर्षांपासून वक्फ बोर्ड आणि जिल्हा प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. या प्रकरणात बीड जिल्हाधिकाऱ्यांसह वक्फच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ➧ (उर्वरित पान २ वर)

## भगवानबाबांनी मानवाच्या कल्याणासाठी देह झिजवला

### प्रकाश महाराज साठे बडेवाडी येथे जयंती निमित्त आरोग्य शिबिर संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

श्री राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीच्या निमित्ताने माजलगाव तालुक्यातील बडेवाडी येथे कीर्तन व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने मंगळवारी करण्यात आले होते. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी कीर्तना श्रवण करण्या सोबतच आरोग्य शिबिर व महाप्रसादाचा लाभ घेतला. संत भगवान बाबांनी समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी आपला देह झिजवला असल्याचे



प्रतिपादन ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांनी केले.

ह.भ.प.प्रकाश महाराज साठे यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या आध्यात्मिक जिवनाचा आलेख कीर्तनाद्वारे मांडला. यावेळी जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप, रविराज बडे, जैतापूरचे सरपंच भागवत दराडे, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर यांची प्रम ुख उपस्थिती होती. जिवनात ➧ (उर्वरित पान २ वर)



## आरोग्यसेवेसोबत गणेशोत्सव साजरा करणे म्हणजे परंपरा आणि मांगल्याचे दर्शन : प्रविण पोकळे

**आष्टी । प्रतिनिधी**

आरोग्यसेवा करणे म्हणजेच श्रीगणेशाची सेवा होय,आरोग्यदुतांनी आपल्या दैनंदिन आरोग्य सेवा करत वेळात वेळ काढून गणेशोत्सव साजरा करणे म्हणजे भक्तीच्या वेगळ्या वाटा चोखाळत उत्सवाची परंपरा आणि मांगल्य कायम ठेवण्याच्या प्रयत्न करत संस्कृतीचे दर्शन घडवत सामाजिक बांधिलकी जोपासणे असल्याचे प्रतिपादन आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे ➧ (उर्वरित पान २ वर)

*खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या बीड जिल्हा शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे सदिच्छा भेट दिली असता*



*त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा जनसंपर्क कार्यालयाच्या श्री.गणरायाची आरती खासदार बजरंग बप्पांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, शहर प्रमुख शेख निजाम भाई, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष सय्यद नय्युम भाई, जयंत वाघ,विनोद गूंड पाटील, दिपक घोडके पाटील, अजय गायकवाड, राजेंद्र सातपुते, राकेश दादा ढोले सह सर्व उपस्थित होते.*

## गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर तलवाडा रस्ता प्रमुख मार्गावरून पोलिसांचे पथसंचलन

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गणेश उत्सवाच्या निमित्ताने कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवन्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या नेतृत्वाखाली हे पथसंचलन झाले. सोमवारी सकाळी पोलीस स्टेशन ते डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकापासून पथसंचलनाला सुरुवात झाली. पोलिस अधिकारी व पोलिसांनी पथसंचलन केले. पोलीस दलाने ➧ (उर्वरित पान २ वर)



# माजलगावात आमदार प्रकाश सोळंके यांचा सर्व पक्षीय समितीच्या वतीने भव्य सत्काराचे आयोजन

## सत्कार समितीच्या अध्यक्षपदी सुरेंद्र रेदासणी तर सचिव पदी अच्युत लाटे, मनोहर डाके, उमेश मोगरेकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा यांच्या वतीने महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते माजलगाव मतदार संघाचे आम दार प्रकाश सोळंके यांना उत्कृष्ट भाषणाबद्दल पुरस्कार देण्यात आला आहे. त्यानिमित्त माजलगाव मतदार संघातील सर्वपक्षीय नागरिकांच्या



वतीने भव्य असा सत्कार सोहळा करण्याचे आयोजिले आहे. त्यासाठी काल मंगळवारी दिनांक १० सप्टेंबर रोजी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात सर्व पक्ष व संघटनांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत या नागरी सत्कार समारंभा निमित्त सर्वपक्षीय सत्कार समितीचे गठन करण्यात आले. या समितीचे अध्यक्ष म्हणून व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच सत्कार समितीचे सचिव म्हणून अच्युत लाटे, मनोहर डाके, उमेश मोगरेकर, सहसचिव पदी रवींद्र कानडे, उमेश जेथलिया, नवनाथ धाईजे, कोषाध्यक्षपदी सुनील रुद्रवार, म ार्गदर्शक म्हणून जयदत्त नरवडे, श्रीहरी मोरे व संभाजी शेजुळ यांची निवड करण्यात आली. तर दयानंद स्वामी, अरुण राऊत, मुसदिक बाबा, नारायण होके, तुकाराम येवले, कुणाल दुगड, अभय होके, राजेश घोडे, नासेरखान पठाण, महावीर मस्के, डॉ.वसीम मनसबदार, अॅड.अमित नाटकर, ➧ (उर्वरित पान २ वर)


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com